# महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद 34 वे अधिवेशन, दि. 09, 10 व 11 ऑक्टों. 2017

# अहवाल

वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर आयोजित महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद 34 वे अधिवेशन, दि. 09, 10 व 11 ऑक्टों. 2017 रोजी संपन्न झाले. सदर अधिवेशनाचा मुख्य विषय **'तत्त्वज्ञान : चिकित्सा आणि जीवनमार्ग'** हा होता.

## सोमवार, दि. 09 आक्टोबर 2017

### उद्घाटन समारंभ :

दि. 09 आक्टो. 2017 रोजी सकाळी 10.00 वाजता मा. डॉ. सुनेत्रा महाराज पाटील (संचालक, व. ना. शा. क. व स. वि. संस्था, नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उद्घाटक, संमेलनाध्यक्ष व बीजभाषक म्हणून मा. डॉ. शुभदा जोशी माजी तत्त्वज्ञान विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई या उपस्थित होत्या. तसेच व्यासपीठावर महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. मोहनराव देशमुख, कार्याध्यक्ष डॉ. सुनिल गवरे तसेच स्थानिक सचिव, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद 34 वे अधिवेशन डॉ. शैलजा खोरगडे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व सरस्वतीच्या प्रतिमेस माल्यार्पण करून झाली. याप्रसंगी संस्थेच्या संगीत विभागाने स्वागत गीत, संस्था गीत व विद्यापीठ गीत सादर केले. परिषदेच्या स्थानिक सचिव डॉ. शैलजा खोरगडे यांनी सर्वांचे स्वागत करून 34 व्या अधिवेशनाचे उद्दिष्ट स्पष्ट केले व संस्थेचा गौरवशाली इतिहास सांगीतला तसेच महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. मोहनराव देशमुख यांनी महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेची स्थापना, कार्य व उद्दिष्ट याविषयी आपले विचार व्यक्त केले. तत्त्वज्ञानाला उर्जितावस्था आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकताही त्यांनी बोलून दाखविली.

डॉ. शुभदा जोशी यांनी अधिवेशनाचे उद्घाटन करून **'तत्त्वज्ञान : चिकित्सा आणि जीवनमार्ग'** या विषयावर विचार व्यक्त केले. आपले विचार व्यक्त करताना त्यांनी आपल्या विषयाची मांडणी चार भागामध्ये केली. 1) तत्त्वज्ञान म्हणजे काय? 2) भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून 'चिकित्सा' म्हणजे काय? 3) भारतीय दृष्टिकोनातून जीवन दर्शनाचा अर्थ काय? तसेच 'चिकित्सा' आणि 'जीवनमार्ग' यांच्यातील संबंध काय? 4) तत्त्वज्ञानाची सद्यकालीन जीवनातील प्रस्तूतता आणि तत्त्वज्ञानाच्या वाटचालीमध्ये काही सकारात्मक गोष्टी विद्यापीठीय व महाविद्यालयीन पातळीवर होऊ शकतात का? हया व्यवहारीक बाबींवर प्रकाश टाकला. शेवटी आपल्या विचारांचा समारोप करताना त्या म्हणाल्या की, पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या मापदंडाने भारतीय दार्शनिक परंपरेचे मूल्यमापन करण्याऐवजी वैश्विक संदर्भात भारतीय परंपरेच्या दृष्टिकोनातून समकालीन प्रश्नांची मांडणी करणे अधिक संयुक्तिक ठरेल.

यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. डॉ. सुनेत्रा महाराज पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उत्तरेश्वर सुरवसे यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर शाहाकार यांनी मानले.

**पोस्टर स्पर्धा उद्घाटन :**

महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या अनुषंगाने तत्त्वज्ञान विभागाद्वारे तत्त्वज्ञानातील विविध विषयांवर आंतरमहाविद्यालयीन भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. शुभदा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. या स्पर्धेमध्ये व.ना.शा.क.स.वि. संस्थेचे अश्विन सोनूले यांना प्रथम क्रमांक मिळाला तर द्वितीय क्रमांक व.ना. शा.क.स.वि. संस्थेतील कु. प्रिया कपूर यांनी मिळवला. याशिवाय हिस्लॉप महाविद्यालयातील किशन वर्मा व जयंत हरणे यांना विभागून उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. शर्मिला विरकर व डॉ. वृषाली कुलकर्णी यांनी कार्य केले.

**पहिला तांत्रिक परिसंवाद :**

परिषदेच्या पहिल्या दिवशी दुपारच्या सत्रात (2:00 ते 5:30) **'कलेचे तत्त्वज्ञान'** याविषयावर पहिला परिसंवाद संपन्न झाला. या परिसंवादात डॉ. वैजयंती बेलसरे, डॉ. संगीता पांडे, डॉ. मोहनराव देशमुख व डॉ. उषा गडकरी या मान्यवरांनी आपले विचार मांडले. या परिसंवादाचे अध्यक्षस्थान डॉ. विवके गोखले यांनी भूषविले.

परिसंवादाचे सूत्रसंचालन प्रा. वर्षा जपे यांनी केले तर आभार प्रा. रीना बावनकुळे यांनी मानले.

**सांस्कृतिक कार्यक्रम :**

सायंकाळी 06:00 वाजता सर्व उपस्थितांकरीता संस्थेतील संगीत विभागाद्वारे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' यांची विविध भजने सादर केली. उपस्थितांनी या भजनांचा मनसोक्त आस्वाद घेतला.

## मंगळवार, दि. 10 ऑक्टोबर 2017

**दुसरा तांत्रिक परिसंवाद :**

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात (09:00 ते 01:00) **'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे तत्त्वज्ञान'** या विषयावर दुसरा परिसंवाद संपन्न झाला. या परिसंवादात डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. दिनकर येवलेकर, डॉ. अशोक राणा व डॉ. दिपक पूनसे या मान्यवरांनी आपले विचार मांडले. या परिसंवादाचे अध्यक्षस्थान डॉ. शरद निंबाळकर (माजी कुलगुरू, कृषी विद्यापीठ, नागपूर) यांनी भूषविले.

परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. रजनी तोंडचिरकर (हुद्दा) यांनी केले तर आभार डॉ. सुमेरू गोंडाणे यांनी मानले.

**व्यक्तिगत निबंधवाचन :**

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी दुपारच्या सत्रात (02:00 ते 06:30) व्यक्तिगत निबंधवाचनाची चार सत्रे घेण्यात आली. या सत्रात 20 निबंधांचे वाचन करण्यात आले. या चार सत्रांचे अध्यक्षपद अनुक्रमे डॉ. संगीता पांडे, डॉ. वैजयंती बेलसरे, डॉ. शर्मिला विरकर व प्रा. नवनाथ रासकर यांनी भूषविले.

**सर्वसाधारण सभा :**

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी सायंकाळी 06:30 वाजता सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेचे अध्यक्षपद महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. मोहनराव देशमुख यांनी भूषविले. या सभेमध्ये इतर विषयासह पुढील वर्षीच्या तत्त्वज्ञान परिषदेचे स्थान व आयोजक ठरविण्यात आले.

## बुधवार, दि. 11 ऑक्टोबर 2017

**विद्यार्थी निबंध सादरीकरण स्पर्धा :**

परिषदेच्या तिसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात (सकाळी 09:00 वा.) महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेद्वारा 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी', 'जे. कृष्णमूर्ती यांचे शैक्षणिक विचार' आणि 'संत श्रेष्ठ की शास्त्रज्ञ' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी निबंध सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे समन्वयक डॉ. सुनिल काळमेघ हे होते. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. रेणूका काणेकर (एस. पी. कॉलेज, पुणे), द्वितीय क्रमांक रोहित यादव (व.ना.शा. क.स.वि.स, नागपूर) व तृतीय क्रमांक हिरण मिश्रा (इस्माईल युसूफ कॉलेज, मुंबई) या विद्यार्थ्यांनी मिळविला.

**वक्तृत्व स्पर्धा :**

परिषदेच्या तिसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रात (सकाळी 11:00 वा.) महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेद्वारा विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे समन्वयक डॉ. जयसिंग सावंत हे होते. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक विनय पाटील, (हिस्लॉप कॉलेज, नागपूर) द्वितीय कु. दिपाली टेकाम व तृतीय क्रमांक कु. नेहा हटवार या विद्यार्थ्यांनी मिळविला.

**खुली निबंध स्पर्धा :**

महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेद्वारा 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन व कार्य' या विषयावर खुली निबंध स्पर्धा आयाजित करण्यात आली. डॉ. नवनाथ रासकर हे या स्पर्धेचे समन्वयक होते. अनेक विद्यार्थी, शिक्षक व तत्त्वज्ञान प्रेमींनी यात सहभाग घेतला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक श्री बालाजी नरवाडे (नितीनिकेतन महाविद्यालय, जाम), द्वितीय क्रमांक सौ. निलम देशमुख (मूधोजी कॉलेज, फलटण) व तृतीय क्रमांक प्रा. स्नेहा बडकस (व.ना.शा.क.स.वि.स. नागपूर) यांनी मिळविला.

**समारोप समारंभ :**

दि. 11 आक्टो. 2017 रोजी तीन दिवसीय महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या 34 व्या अधिवेशनाचा समारोप समारंभ, दुपारच्या सत्रात (दुपारी 02.00 वाजता) डॉ. सुनीती नी. देव यांच्या अध्यक्षतेखली संपन्न झाला. व्यासपीठावर महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. मोहनराव देशमुख, कार्याध्यक्ष डॉ. सुनिल गवरे तसेच स्थानिक सचिव, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद 34 वे अधिवेशन डॉ. शैलजा खोरगडे उपस्थित होते. उपस्थितांतर्फे डॉ. शर्मिला विरकर, डॉ. मिनल कातरणीकर यांनी परिषदेविषयी मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. मोहनराव देशमुख यांनीही परिषदे संबंधी आपले मनोगत व्यक्त केले व परिषदेच्या यशस्वीतेबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

प्रा. डॉ. अमन बगाडे यांना 'Indian Iconic Educationist Award" मिळाल्याबद्दल परिषदेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थी निबंध सादरीकरण स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व खुली निबंध स्पर्धा यातील विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आले.

शेवटी, कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. सुनीती नी. देव यांनी अभिजात ग्रंथांचे भाषांतर व्हावे व तत्त्वज्ञानात सकस लिखाण व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. संभाजी पाटील यांनी केले तर आभार डॉ. शैलजा खोरगडे यांनी मानले.

संस्थेच्या मा. संचालक डॉ. सुनेत्रा महाराज पाटील, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे सर्व पदाधिकारी यांच्या अमूल्य मार्गदर्शनाशिवाय परिषदेच्या यशस्वीतेची कल्पना पूर्णत्वास आली नसती. शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्था, अमरावती येथील तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ. राजेसाहेब माराडकर, व. ना. शा. क. स. वि. संस्था, नागपूर येथील प्राध्यापक व कर्मचारीवृंद, तसेच तत्त्वज्ञान विभागातील डॉ. शैलजा खोरगडे, प्रा. रीना बावनकुळे, डॉ. सुमेरू गोंडाणे, डॉ. जयसिंग सावंत व प्रा. ज्ञानेश्वर शाहाकार, यांच्या सहकार्याने अधिवेशन यशस्वीपणे संपन्न झाले. विभागातील विद्यार्थ्यांनीही आपला खारीचा वाटा उचलला व परिषद परिपूर्णतेकडे नेली.